# घराच्या १ किमी टप्प्यात शाळा नाही, मग आरटीईतून प्रवेश कसा मिळणार?

## लोकेशनचाही पेच : शाळा नसल्याने तसेच असलेल्या शाळा दिसत नसल्याने पालकांमध्ये संभ्रम

बीड । दिव्य वार्ता ।

शिक्षण विभागाने आरटीईअंतर्गत प्रवेशासाठी घरापासून शाळेच्या अंतराची ३ किमीची मर्यादा कमी करून १ किमीवर आणली आहे. त्यामुळे घराजवळ शाळा नसणाऱ्या आणि पसंतीची शाळा न मिळणाऱ्या, तसेच ग्रामीण भागातील शेकडो विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहण्याची भीती आहे.

शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम (१२) (सी) (एक) नुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांना स्वयंअर्थसाहाय्यित विनाअनुदानित शाळांमध्ये २०२६-२७ या वर्षासाठी आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे; परंतु घरापासून शाळेचे लोकेशन न दिसणे, नियमानुसार अंतराच्या टप्प्यात शाळा नसणे, अशा तक्रारी समोर आल्या आहेत.

### आरटीई प्रवेशाचे नियम बदलले

यावर्षीच्या प्रवेश प्रक्रियेत घर ते शाळेचे अंतर आणि निवासी पुराव्याबाबत काही नियम बदलले आहे. उर्वरित नियम तेच आहेत.

### हजारो विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेआधीच बाद

एक किलोमीटरच्या अटीमुळे ज्यांना या योजनेतून प्रवेश घ्यायचा आहे, त्यांच्या घरापासून शाळेचे अंतर एक किलोमीटरपेक्षा दूर आहे, ते विद्यार्थी विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेआधीच बाद झाले आहेत.




### प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक काय ?

पालकांनी अर्ज भरण्याची मुदत १० मार्चपर्यंत राहील. प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नाही.

### लोकेशन पाच वेळाच बदलता येणार?

अर्ज भरताना शाळेपासून ते घरापर्यंतचे हवाई अंतर हे गुगल मॅपने निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे शाळा निवडताना अंतराची बाब लक्षात घेऊन पालकांना बलूनद्वारे निवासस्थानाचे ठिकाण निश्चित करण्यासाठी तो बलून जास्तीत जास्त पाच वेळाच बदलत योणार आहे.

### ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे काय ?

पूर्वी घरापासून तीन किलोमीटरच्या परिघात असलेली शाळा निवडता येत होती. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येत होता; परंतु आता एक किलोमीटरच्या अटीमुळे जर शाळा नसेल तर या विद्यार्थ्यांना शाळा पोर्टलवरून दिसणार नाही. मग त्यांनी काय करायचे, असा प्रश्न आहे.




### इतर नवीन नियम कोणते ?

घरापासून शाळेच्या अंतराच्या नियमात बदल करण्यात आला आहे, तर निवासाचा पुरावा म्हणून नवीन नियमानुसार गॅस बिल आता ग्राह्य धरले जात नाही. त्याऐवजी राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबुक किंवा वीज बिल वापरता येते. प्रवेशासाठी मुलाचे वय ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत ६ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.

### घराच्या १ किमीच्या टप्प्यात हवी शाळा

आता पालकांना त्यांच्या घरापासून केवळ १ किलोमीटरच्या परिघात असलेल्या शाळाच निवडीसाठी दिसतील.

पूर्वी हे अंतर ३ किलोमीटरपर्यंत होते. यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळणार आहे.

### जिल्ह्यात एकूण किती जागा ?

| तालुका | शाळा | जागा |
|---|---|---|
| अंबाजोगाई | ३४ | ३०० |
| आष्टी | १० | १०२ |
| बीड | १७ | २३१ |
| धारूर | ८ | १३१ |
| गेवराई | ३६ | ३८७ |
| केज | २२ | २१६ |
| माजलगाव | २७ | २६८ |
| परळी | २३ | २९४ |
| पाटोदा | ३ | ३३ |
| शिरूर कासार | ७ | ७७ |
| यूआरसी बीड | २० | ३२० |
| वडवणी | ७ | ६३ |
| एकूण | २१४ | २,४२२ |





या लहानग्या लेकरांना हे मिसाईल किती खतरनाक आहे याची कल्पना नाही.. इराणमध्ये शाळेवर डागले गेलेल्या मिसाइलने या लेकरांसारख्या शेकडो लेकरांचा बळी घेतला.. आता हे मिसाईल देखील इराणचे असून पूर्ण सीरियामध्ये न फुटलेल्या अवस्थेत पडलेले आहे. स्थानिक लोकं मोकळ्या जागेत पडलेल्या या मिसाईलला पाहण्यासाठी येत आहेत.. त्याच्या आजूबाजूला लहानगे लेकरं मेंढ्यांना चारण्याचे काम करत असताना त्या मिसाईल सोबत खेळत आहेत. युद्ध कुणाचं नुकसान करतं तर ते या लेकरांच्या भविष्याचे, जगण्याचे, आनंदाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करते.. एखादा देश हरतो, एखादा जिंकतो मात्र नुकसान होतं तिथल्या सर्वसामान्यांचे. मिसाईल सोबत खेळणाऱ्या लेकराला ते मिसाईल त्याच्या भविष्याला उडवून देणारं आहे हे माहिती नाही.. !!

## ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर’ ; ७ मार्चला दौलावडगाव येथे शेतकरी भवनात आयोजन

दौलावडगाव, (दिव्य न्युज) : आष्टी तालुक्यातील महसूल मंडळ दौलावडगाव येथील शेतकरी भवनात दि. ७ मार्च २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर’ अभियानांतर्गत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील विविध महसूल मंडळांमध्ये वेगवेगळ्या दिवशी ही शिबिरे घेण्यात येणार असून, दि. १५ मे २०२७ पर्यंत हे अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार वैशाली पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

या शिबिरामध्ये नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रामुख्याने प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, सातबारा उताऱ्यांतील त्रुटी दुरुस्ती करणे व संगणकीकृत सातबाऱ्याबाबत मार्गदर्शन, विविध प्रकारची प्रमाणपत्रे वितरित करणे, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अंतर्गत मंजुरी आदेशांचे वितरण, ई-मोजणी, कृषी संचयन नोंदणी, ई-केवायसी प्रक्रिया, भूसंपादन विषयक मार्गदर्शन, तुकडेबंदी व्यवहार नियमित करणे तसेच बळीराजा पाणंद रस्त्यांबाबत माहिती आदी विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार सुरेश धस उपस्थित राहणार असून, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी विवेक जोन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अपर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक उपस्थित राहणार आहेत. तसेच सन्माननीय उपस्थितीमध्ये आमदार भिमराव धोंडे, आमदार बाळासाहेब आजबे, आमदार साहेबराव दरेकर, उपविभागीय अधिकारी वशिमा शेख, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, कृषी अधिकारी गोरख तरटे, आरोग्य अधिकारी राजेंद्र तांदळे, नायब तहसीलदार पांडुरंग मांडेकर, नायब तहसीलदार अश्विनी पडोळे, नायब तहसीलदार प्रकाश शिरसेवाड आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. महसूल विभागाच्या वतीने शेतकरी बांधवांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अमेरिकेचा बदाम, इराणचे खजूर; रमजानमध्ये सुकामेव्याला भाव..!

### खजूर, पिस्ता, काजू, बदामाला मागणी, युद्धामुळे सुकामेव्याच्या दरवाढीचे संकट घोंगावू लागले








बीड। दिव्य वार्ता ।

पवित्र रमजान महिन्यात मुस्लीम धर्मियांकडून मोठ्या प्रमाणात उपवास केले जातात. त्यामुळेच खजूर, काजू, बदाम, बेदाणा, चारोळी, पिस्ता, अंजीर, अक्रोड, केशर, खोबरे आदी प्रकारच्या सुकामेव्याला मागणी वाढली आहे.

रमजान ईदचा सण जवळ येत असल्याने बाजारात मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. यंदा सुकामेव्याचे दर दिवाळीपासून स्थिर होते. परंतु अमेरिका, इस्रायल इराणच्या युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत सुकामेव्याच्या दरवाढीचे संकट घोंगावत आहे.

### रमजानमध्ये बाजारपेठा बहरल्या

मुस्लीम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली आहे. यामुळे बाजारात सुका मेवा तसेच खाद्यपदार्थ, कपडे, पादत्राणे, गृहोपयोगी वस्तूंची दुकाने सजली आहेत.




### नुसत्या खजूरचे २०० ते ३००० रुपयांपर्यंत दर

साधारण खजुरापासून ते उच्च प्रतीच्या खजुरापर्यंत विविध प्रकार बाजारात आहेत. साधे खजूर, मेडजूल, मझाफती, अजवा काळा, प्रीमियम, ड्राय डेट, जाहिदी, खलास आदी प्रकारचे खजूर येथील बाजारात उपलब्ध आहेत. २०० ते ३००० रुपये किलोपर्यंत याचे दर आहेत.

### गतवर्षीपेक्षा यंदा दरात किती बदल ?

गतवर्षीच्या तुलनेत यंदा खजुरासह सुका मेव्याच्या किमतीत दहा ते पंधरा टक्क्यांची वाढ झाली आहे. दिवाळीपर्यंत खोबरे वगळता सुका मेव्याचे दर स्थिर होते. परंतु गत दोन आठवड्यात भाव काही प्रमाणात वधारले आहेत.



### कुठून कोणता सुकामेवा येतो?

मुंबई, पुणे, दिल्ली येथील घाऊक बाजारातून स्थानिक व्यापारी सुकामेव्याची खरेदी करतात. अमेरिका, इराण, इराक ऑस्ट्रेलिया येथून बदामाची आवक होते.

भारतासह आफ्रिकेतून काजूची तर सौदी अरेबिया आणि अफगाणमधून खजुराची आवक होते. इराण, इराकमधून पिस्ता तर दुबई, पाकिस्तानातून खारीक तसेच तामिळनाडू, कर्नाटक, केरळमधून खोबरे तर महाराष्ट्रासह इतर राज्यातून बेदाण्याची आवक होते.

“ सुका मेव्याची आवक बाजारात मोठ्या प्रमाणात असल्याने युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम जाणवणार नाही. युध्दाच्या आधीच व्यापाऱ्यांनी नियोजन केलेले आहे. भावही सद्या स्थिर आहे. खजुराची आवक असुन मागणी कमी आहे. इराणी पिस्ताचा भाव वधारला आहे.

–प्रदीप सारडा,
सुकामेव्याचे व्यापारी, बीड

### सुकामेव्याला मोठी मागणी

रोजा सोडताना इफ्तारच्या वेळी खजुराला प्राधान्य दिले जाते. बीडमध्ये खजुरासह काजू, बदाम इतर सुका मेव्याची आवक आणि मागणी वाढली आहे.

### यंदा बाजारात तब्बल २ हजार क्विंटल आवक

सर्व प्रकारचा सुकामेवा लक्षात घेता यंदा बाजारात २००० क्विंटल आवक झाली आहे. यात खजुराचे प्रमाण जास्त आहे.



### बाजारात दर असे

| सुकामेवा | प्रतिकिलो दर रुपयांत |
|---|---|
| खजूर | २०० ते ३००० |
| खोबरे | २५० ते ३५० |
| बदाम | ९०० ते १२०० |
| काजू | ८५० ते १५०० |
| अंजीर | १६०० ते २४०० |
| चारोळी | १८०० ते २००० |
| पिस्ता | २००० ते २६०० |
| किसमिस | ४०० ते ९०० |

# 'पृथ्वी' वरच्या 'राजे' शाहीत खानपान का मारहाण?

## पंडितांच्या स्वागत सोहळ्यात युवराजांची पाहुण्यास गढीवरून शिवीगाळ!

गेवराई । दिव्य वार्ता ।

लग्न सोहळ्यात शत्रू जरी आला तरी त्याचे स्वागत करण्याचा रिवाज राहिला आहे मात्र गेवराईच्या गढीवर वेगळेच घडले .माजी आ अमरसिंह पंडित यांचे चिरींजीव रणवीर पंडित यांच्या विवाह प्रित्यर्थ स्वागत समारंभ होता .यात भाजपचा ढाकणे नामक कार्यकर्ता शुभेच्छा देण्यास आला असता पृथ्वी पंडित यांना शिवीगाळ करून हाकलून लावण्याचा प्रकार घडल्याची चर्चा आहे . पंडितांच्या शाही कार्यक्रमाला शीघरकोपी युवराजने गालबोट लावल्याची चर्चा आहे .यामुळे अमरसिंह पंडितांना माफी मागण्याची नामुष्की देखील यावेळी आल्याचे बोलले जात आहे .

गेवराई आमदार असलेले विजयसिंह पंडित यांचे पुतणे तथा अमरसिंह पंडित यांचे चिरंजीव रणवीर पंडित आणि डॉ सृष्टी यांचा स्वागत समारंभ १ मार्च सायंकाळी ६ वाजता गढी येथील तुळजाभवानी मंदिर परिसरात भव्य शामियाना लावून आयोजित केला .शाही पकवान मंच सजावट होती मात्र पाहुण्यांना सन्मान देण्याची रीत संस्कृती दैठणात विसरून आले होते कि काय अशी शंका येते कारण जयसिंह पंडित यांचे चिरंजीव पृथ्वी पंडित यांनी एका ढाकणे नामक व्यक्तीश शिवीगाळ केली . तू इथे आलाच कसा चल निघ म्हणत आईवर शिव्या दिल्याची चर्चा आहे .यामुळे पंडित कुटुंबात हे संस्कार दिले जाते का अशी चर्चा तालुक्यात सुरु आहे .अमरसिंह पंडितांनी वरबाप म्हणून माफी मागितली तरीही जी नामुष्की व्हायची ती झालीच असे लोक बोलत आहेत .





### पृथ्वी पंडितांची दादागिरी चर्चेत

शिवाजीराव पंडित यांच्या राजकारणात रुबाब अदब राहिला आहे मात्र त्यांची तिसरी पिढी सामान्य लोकांवर मर्दमुखी गाजवत आहे कारण रस्त्यावर गाडीवर उभा राहून मामा माजी आ पंडितांना शिवीगाळ असेल किंवा नगर पालिका प्रचारातले भांडण.भांडण केंद्रस्थान पृथ्वी पंडित यांच्याकडे राहिले आहे .लोकशाहीत अशी राजेशाही लोकांना पटत नसते आणि याचा योग्य परतावा योग्य वेळी काढला जात असतो असे लोक बोलतात .

### ढाकणे ओबीसी म्हणून हा द्वेष का

पंडितांच्या राजकारणात कधी नव्हे तो जातीय दर्प समोर येतो आहे.चर्चेचा मागोवा घेतला असता ढाकणे नामक व्यक्तीला अधिकृत स्वागत सोहळ्याची पत्रिका असताना ढाकणे ची आई काढणे कितपत योग्य आहे .तो ओबीसी आहे म्हणून हा द्वेष का अशी चर्चा होत आहे .

### शिवछत्रचे बछडे संस्कार फाडू लागले!

पंडित आता गेवराई सह बीड मध्ये आपला राजकीय विस्तार करत आहेत .मात्र पृथ्वी पंडित सारखी पिढी ते जनतेला देणार असतील तर बीड गेवराई सोडा पंडितांचे राजकारण दैठणात देखील राहील अशी शंका का येऊ नये .आपण गोदाकाठ चे वाघ असाल म्हणून तुमचे बछडे सामान्य लोकांना फाडून काढणार का असा सवाल उभा राहत आहे .रणवीर पंडित सोज्वळ स्वभावाचे आहेत मात्र त्याच्या स्वागत सोहळ्यात चुलत भावाने हा धुडगूस घालावा हे दुर्दैवी आहे .

---

## गुरूजी गैरहजर, शिक्षणाधिकारी हजर, घंटा वाजवून भरवली शाळा

**शिक्षणाधिकाऱ्यांनी स्वतः टाइप करुत गुरुजींना बजावली नोटीस : रांजणी शाळेतील प्रकार**



बीड, (दिव्य न्युज) : गेवराई तालुक्यातील रांजणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुरुवारी शिक्षक गैरहजर आणि शिक्षणाधिकारी हजर असे चित्र पाहायला मिळाले. शाळेची वेळ ८:३० आहे. यादरम्यानच शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर आणि अधीक्षक रंगनाथ राऊत या शाळेवर पोहचले. तेथे सेवक झाडलोट करताना दिसून आला, तर एकही शिक्षक हजर नव्हते. त्यामुळे खुद्द शिक्षणाधिकाऱ्यांनी शाळेची घंटा वाजवून वेळेवर न येणाऱ्या शिक्षकांना जागे केले.

आपण शाळेत नसताना घंटा वाजल्याने शिक्षकही अचंबित झाले शाळेची वेळ ८:३०ची असताना ९:०० वाजता एक शिक्षक आला, तर शिक्षणाधिकारी मॅडम आल्याची वार्ता गावात पसरली. सकाळी ९:३० वाजेपर्यंत शिक्षणाधिकारी शाळेच्या परिसरातच होत्या. त्यांच्याकडील लॅपटॉपवर स्वतः टाइप करून जिल्हा कार्यालयाकडून जावक क्रमांक शाळेवरील मागवून गैरहजर मुख्याध्यापक अनिल गोल्हार, सहशिक्षक प्रल्हाद खेत्रे, अजय पतंगे, सपना मस्के, छाया खांडे, अर्चना पुरी यांना विनावेतनाची कारवाई का करू नये म्हणून नोटीस बजावली. यावेळी शिक्षणाधिकाऱ्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. रांजणीप्रमाणे इतर शाळांनाही शिक्षणाधिकाऱ्यांनी सरप्राईज व्हिजीट करुन शिस्त लावण्याची मागणी आहे.

## शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा-सय्यद फरहान

**बीड नगर परिषदेला निवेदनाद्वारे केली मागणी**



बीड, (दिव्य न्युज) : बीड शहरातील मोकाट कुत्र्यांचा प्रमाण खूप प्रमाणात वाढलेले आहे. या मोकाट कुत्र्यांच्या वावरामुळे शहरातील व परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे व या मोकाट कुत्र्यांनी बीड शहरातील काही लोकांना चावा घेतला आहे. शाळेत दररोज येणारे जाणारे लहान मूले यांना तर रोजच या भितीमध्ये दहशतीमध्ये जीव घेणा प्रवास करावा लागत आहे. दरम्यान बीड शहरात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून काही अनुचीत घटना टाळण्यासाठी बीड नगर परिषदने तातडीने कठोर उपय योजना कराव्यात व मोकाट कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांतुन जोर धरत आहे.

बीड नगर परिषद कार्यालयात या मागनी निवेदन सादर करताना बीड शहर कांग्रेस सरचिटनिस सय्यद फरहान शराफत, मोमीन जकीयोद्दीन (मामु गूत्तेदार,नगर सेवक),शेख आमेर पाशा संस्थापक शेर ए हींद संघटना,साजीद लतीफ कूरेशी ओबीसी कांग्रेस बीड शहर व इतर जन उपस्थित होते

## उन्हाळ्याआधीच पाण्याचा ताप : गल्लीबोळांत टँकरची वर्दळ वाढली





उन्हाबरोबरच बीड शहरात आता पाणीटंचाईच्या झळा जाणवत आहेत. शहरातील ईदगाह नाका पाण्याची टाकी येथे पाण्यासाठी टँकरची गर्दी दिसत आहे. नगर रोडवर हॉटेलवर खाजगी टँकरव्दारे पाणी पुरवले जात आहे.



बीड शहरातील खासबाग रोडवर अशा प्रकारे टँकरची लाईन दिसून येत आहे. शहरात काही भागात आठ दिवसाला, तर काही उपनगरात दहा दिवसाला एकदा नळाला पाणी येत असल्याने उन्हाळ्याच्या तोंडावर नागरिकांचे हाल होत आहे.





बीड शहरातील नगर रोड भागातही नागरिकांना आठ दिवस पाणी पुरत नसल्याने खाजगी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. सध्या अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. येत्या मे महिन्यात बीड शहरात खाजगी टँकरची संख्या अधिक वाढण्याची शक्यता बळावली आहे.

## इजान समीर शेख याने केला पहिला रोजा पूर्ण

पाचोड, (दिव्य न्युज) : त्याचे वय अवघे सात वर्षे तरी शुक्रवार पहाटे ५.१२ मिनिटांनी ते उठला त्याने भक्ती भावाने नामा दादा केले आणि सकाळी ६.३६ मिनिटापर्यंत ना अन्न मागितले ना पाणी तब्बल तेरा तास होना देख कर त्याने निर्जल रोजा ठेवला आणि मग नमाज अदा करून विस्तार केले इतक्या छोट्या वयात इजान समीर शेख यांनी पहिला रोजा ठेवला सर्व कुटुंबाने त्याचे कौतुक केले.



मुस्लिम बांधवांचे पवित्र रमजान महिना सुरू असून आज सातवा रोजा ( उपवास) पूर्ण झाला आहे यंदा रमजान आहे उन्हाळ्यात आल्यामुळे रखरखत्या उन्हात पाण्याचा थेंबही न पिता जवळपास १४ ते १५ तास राहण्याची शक्तीच जणू देवया दिवसांमध्ये देत असल्याची भावना रोजा करणाऱ्यांमध्ये असते त्यातून त्यांचे रोजा पूर्ण होतो. पाचोड परिसरातून यांनी पहिला रोजा आदा केला. आणि संपूर्ण १४ तास निर्जळ राहिला त्यामुळे त्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. रमजान महिन्यात मुस्लिम बांधवांसाठी सर्वात पवित्र महिना मानला जातो या पवित्र महिन्याची सुरुवात चंद्र दर्शनाने होते रमजान चा महिना कधी २९ तर कधी तीस दिवसाचा असतो रमजान सुरू होताच मुस्लिम लोक रोज रोज सुरू करतात यावर्षी पवित्र महिन्या १९ फेब्रुवारी पासून सुरू आहे. रोज याची सुरुवात सकाळी सेहरीने होते आणि नंतर संध्याकाळी इफ्तारणे रोजा सोडला जातो. इजान शेख यांच्या घरातल्या आई-वडिलांनी समीर शेख व मारियम तसेच आजोबा शहादात भाई यांनी रोजाची सुरुवात केली होतीआजोबा त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत त यांनी रोजा पूर्ण केला.



अलखैर पतसंस्था अंबाजोगाईचे चेअरमन उमर फारूक सर यांचा पुतण्या शेख तलहा इरशाद यांनी आपल्या वयाच्या साडे पाँच वर्षी अयुषाचा पहिला रोजा (उपवास)पुर्ण केला प्रसंगी सर्व नातेवाईक व मित्र परीवाराने शुभेच्या दिल्या.



मोहम्मद साद अशरफ सय्यद, (वय-९) रा.गुलजारपुरा पाटोदा याने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पुर्ण केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०